## कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नावापुर , आब्यास केंद्र ५२२० A
## राष्ट्रीय सेवा योजना – विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर, मौजे मुगधन
## दिनाक: २१ ते २७ डिसेंबर २०१९

### पहिला दिवस – उद्घाटन सोहळा



श्री.प्रभाकर शिवराम गावित दीपप्रज्वलन करुन शिबिराचे उद्घाटन करताना



व्यासपीठावर उपस्थित मान्यवर



उपस्थित स्वयंसेवक विद्यार्थी




डॉ.डी.पी.जायस्वाल अवयव दान, रक्तदान, देहदान या विषयावर मार्गदर्शन करताना




सिकलसेल विषयी माहिती देताना प्रा.पी.बी.बागुल

## दुसरा दिवस



योगासन



ध्यानधारणा

## श्रमदान



चारीचे खोदकाम



शोषखड्डा



परिसर स्वच्छता



रस्ते सफाई




वाचन संस्कृती या विषयावर विद्यार्त्यांना मार्गदर्शन करताना प्रा.राहुल तुपे

तिसरा दिवस



वनराई बंधारा क्रमांक एक




सौरउर्जा विषयावर विद्यार्थ्यांनमध्ये जागृती निर्माण करताना डॉ. आय. जी. पठाण




व्यसन मुक्ती या विषयावर स्वयंसेवकांशी हितगुज करताना डॉ. एस. डी. पाटील

चौथा दिवस



वनराई बंधारा क्रमांक दोन




डॉ.ए.बी.महाजन ग्राहक सुरक्षा कायद्या विषयी माहिती देताना




श्री.प्रदीप हिरे “बेटी बचाव बेटी पाढाओ” या विषयावर बोलताना

| पाचवा दिवस |
|---|




प्लास्टिक मुक्त गाव- जनजागृती फेरी



ग्राम स्वच्छता




आदिवासी समाजातील चाली-रिती व परंपरा या विषयावर बोलताना डॉ.सौ.एम.ए.गावित




प्लास्टिक मुक्ती बद्दल माहिती देताना डॉ.एन.एन.गजरे



व्यसन मुक्ती विषयावरील नाटिका सादर करताना विद्यार्थी




बेटी बचाव बेटी पाढाओ विषयावरील नाटिका सादर करताना विद्यार्थी

## सहावा दिवस




शोषखड्डा निर्मिती



कुपनलीकेच्या आसपासच्या परिसराची स्वच्छता




अंधश्रधा निर्मूलनावर बोलताना
प्रा.एम.डी.उदावंत




अंधश्रधा निर्मूलनावर बोलताना
प्रा.सौ.एस.एम.उदावंत




अंधश्रधा निर्मूलनावर चमत्कार सादरीकरण करताना डॉ.ए.बी.महाजन



अंधश्रधा विषयावरील नाटिका सादर करताना विद्यार्थी

## सातवा दिवस – समारोप समारंभ



जिल्हा समन्वयक डॉ.माधव कदम
यांचे स्वागत करताना डॉ.सौ.सी.एस.गावित




समारोप प्रसंगी मनोगत व्यक्त करताना
प्राचार्य डॉ.ए.जी.जायस्वाल





समारोपपर मार्गदर्शन करताना डॉ.माधव कदम

अध्यक्षीय समारोप करताना मा. तानाजीराव वाळवी





उत्कृष्ट स्वयंसेवकांला पुरस्कार देताना मा.आरिफभाई बालेसरीया

उत्कृष्ट गटाला पुरस्कार देताना मा. तानाजीराव वाळवी व मा.आरिफभाई बालेसरीया

## वर्तमानपत्रात आलेल्या बातम्या



जळगाव तरुण भारत

Main Edition | 2019-12-23 | Page- 7

### रेड रिबन क्लबतर्फे हिवाळी श्रमसंस्कार शिबिरात एड्स जनजागृती

**नवापूर** : येथील कला , वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नवापूर च्या एनएसएस विभागाच्या हिवाळी श्रमसंस्कार शिबिरात रेड रिबन क्लब च्या वतीने एचआयव्ही एड्स विषयावर व्याख्यान व पोस्टर प्रदर्शनचे आयोजन करण्यात आले. एड्सबाबत जनजागृती करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते नवापूर उपजिल्हा रुग्णालयाचे समुपदेशन कैलास माळी यांनी मार्गदर्शन करतांना सांगीतले की , युवकांनी मनातला संकोच व भीती दूर करून जागरूक राहून युवक अवस्थेत उद्भवणाऱ्या लैंगिक समस्या सोडविण्यासाठी एकात्मिक समुपदेशन व चाचणी केन्द्रास भेट देवून समुपदेशनाचा लाभ घेतला पाहिजे आणि एचआयव्ही एड्स या आजाराविरुद्ध लढा दिला पाहिजे. तसेच विवाह पूर्व एचआयव्ही तपासणी देखील करून घेतली पाहिजे. प्रा.डॉ.आय.जी.पठाण यांनी सौर ऊर्जा वापर व जनजागृती या विषयावर मार्गदर्शन केले. प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.छाया गावित यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.डॉ.ई.एस गेडाम यांनी केले. आभार प्रा.प्रियंका पाडवी यांनी मानले. प्रा.ए.ए.मुळे व प्रा.एस.के.कोरडे यांनी परिश्रम घेतले.



तरुण भारत दि 30 डिसें 2019

### नवापूर महाविद्यालयातील रा.से.यो.शिबिराचा समारोप

तभा वृत्तसेवा
नवापूर, २९ डिसेंबर

येथील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर स्थळ मुगधन या गावी पार पडले. त्याचा समारोपीय कार्यक्रम मांजरा आश्रम शाळा याठिकाणी झाला.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रीय सेवा योजनेचे गीत गाऊन व राष्ट्रपिता महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला अभिवादन करून करण्यात आली. त्यानंतर मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आदिवासी सेवा सहाय्यक व शिक्षक प्रसारक संस्थेचे मानद सचिव तानाजीराव वळवी होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतामध्ये देशाच्या वास्तविक परिस्थितीची मांडणी करून हे स्पष्ट केले की, महाविद्यालय हे संस्काराचे केंद्र असून त्यातील विद्यार्थी सुसंस्कृत झाला पाहिजे. प्राचार्य डॉ. ए. जी. जयस्वाल यांनी मनोगत व्यक्त करताना रासेयो एककाने मुगधन या गावामध्ये केलेल्या कामाचे कौतुक करून आमच्या महाविद्यालयाने समाजात एक आदर्श निर्माण केल्याचे सांगितले. जिल्हा समन्वयक डॉ. माधव कदम म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजना ही माणूस घडविण्याची कार्यशाळा आहे. जात धर्माच्या पलीकडे समाज निर्माण करणारी प्रयोगशाळा म्हणजे राष्ट्रीय सेवा योजना होय.

शिबिराच्या समारोपप्रसंगी सात दिवसीय कामाचा अहवाल वाचन करण्यात आला. अहवाल वाचन कार्यक्रम अधिकारी डॉ. छाया गावित यांनी केले. त शिबिरामध्ये उत्कृष्ट गट म्हणून एकलव्य गटाचा सत्कार करून गटप्रमुख जीवन वसावेसह संपूर्ण गटाचा सत्कार करण्यात आला. तसेच उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून एकलव्य गटाचा स्वयंसेवक सनम वळवी यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. मुलींमधून उत्कृष्ट स्वयंसेविका म्हणून जय आदिवासी गटाची राजेश्वरी गावित हिचा सत्कार करून पारितोषिक देण्यात आले. प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे कोषाध्यक्ष आरिफ पालावाला, संस्थेचे संचालक जी. के. पठाण ,उपप्राचार्य प्रा. ए. बी. महाजन व उपप्राचार्य प्रा. वाय. जी. भदाणे, सरपंच रमीला गावीत, उपसरपंच गुलाब गावित, ग्रामपंचायत सदस्य रमेश गावीत, ग्रामसेवक शिमोन वळवी, लताबाई गावीत, मुख्याध्यापक रमेश गावीत, राहुल देव भामरे आदी मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. ई. एस. गेडाम यांनी केले. आभार सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. ए. ए. मुळे यांनी मानले. कार्यक्रमासाठी प्रा. डॉ. एस. के. कोरडे, प्रा. जे. सी. वसावे यांनी परिश्रम घेतले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राध्यापक ,शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.